सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.
ई मेल- edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८
संकेतस्थळ- www.mcaer.org

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३४२६/६१८/२५८८ दि. १२ ऑगस्ट,२०२६

## परिपत्रक

**विषयः- पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२६-२७**
**ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.२९/०७/२०२६ पासून सुरु झालेली आहे. याअंतर्गत ऑनलाईन प्रवेश दाखल करण्याचा अंतिम दिनांक ९/८/२०२६ होता. तसेच तक्रार नोंदणीचा अंतिम दि.१४/८/२०२६ आहे. तथापि, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, शेतकरी प्रमाणपत्र तसेच इतर कागदपत्रे प्राप्त होण्यास विलंब होत असल्याची निवेदने / तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच पदवी अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पडताळणी झालेली नसल्याने महाविद्यालय बदलीचे प्रमाणपत्र मिळत नसल्याचेही ई-मेल संदेश कृषी परिषद कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

उक्त कारणास्तव प्रवेशोच्छुक उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेंतर्गत **ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्यास दि.२२/०८/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.** यामुळे पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ चे पुढील वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | सुधारीत दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | २२-०८-२०२६ |
| २. | 'एबीएस, पुणे' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २५-०८-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| ३. | तक्रार नोंदणीचा कालावधी | २६-०८-२०२६ व २७-०८-२०२६ |
| ४. | 'एबीएस, पुणे' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २८-०८-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| ५. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०२-०९-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ३-०९-२०२६ ते ०५-०९-२०२६ |

| अ. क्र. | कार्यक्रम | सुधारीत दिनांक |
|---|---|---|
| ६. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | ०८-०९-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०९-०९-२०२६ व ११-०९-२०२६ |
| ७. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | १३-०९-२०२६ |
| ८. | **कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे तिसरी प्रवेश फेरी (प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट 'के'** येथील कार्यपध्दतीनुसार) | १७-०९-२०२६ व १८-०९-२०२६ |
| ९. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २१-०९-२०२६ |

कृपया सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार व इतर संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**(राहुल महिवाल)**
**महासंचालक**

प्रतः-

(१) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

(२)मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.